आंतरजिल्हा बदलीने नेमणुक देणेबाबत.
(श्रीम स्वाती प्रविण बोराडे, वरिष्ठ सहाय्यक (लि),
पंचायत समिती चाळीसगाव, जि.प.जळगाव)

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**सामान्य प्रशासन विभाग-२**
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/३४०६९५३/६४९/२०२६
**अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे**

**संदर्भ:-** १. महाराष्ट्र शासन जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम नियम ६ (८) व ९ (५)
२. कक्ष अधिकारी, ग्रा.वि.व ज.सं.विभाग महा.शासन मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. जिपब-७११/प्र.क्र.११३/११ आस्था-१४ दि. २९ सप्टेबर २०११
३. उपसचिव, ग्रा.वि.व ज.सं.विभाग महा.शासन मुंबई यांचेकडील शासन शुद्धीपत्रक क्र.न्यायप्र-०५१२/प्र.क्र.११८/१२ आस्था-१४ दि.१८ ऑक्टो.२०१२
४. मु.का.अ., जि.प.जळगाव यांचेकडील पत्र साप्रवि/रवका/आरआर/२५६/ई-२७०३०९२/२०२६ दिनांक १०/०६/२०२६

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम ६ (८) च्या तरतुदीस अधिन राहुन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील संदर्भीय परिपत्रक क्र. २ नुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, खालील वरिष्ठ सहाय्यक (लि) यांना त्यांच्या नावापुढे रकाना क्र ६ मध्ये नमुद केलेप्रमाणे आंतरजिल्हा बदलीने खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन सामावुन घेण्यात येत आहे.

| अ. क्र | कर्मचाऱ्याचे नाव | सध्याचे कार्यालय | निवडीचा प्रवर्ग | सामावून घेणेचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीम स्वाती प्रविण बोराडे | पंचायत समिती चाळीसगाव, जिल्हा परिषद जळगाव | अनु जाती | अनु जाती | पंचायत समिती श्रीरामपुर |

**अटी व शर्ती :-**

१) वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट क कर्मचाऱ्यांना त्यांच्या सुधारीत वेतनस्तर एस-८ (२५५००-८११००) या वेतनस्तरामध्ये ते सध्या ज्या मुळ वेतनावर काम करीत आहेत त्याच मुळ वेतनावर त्यांची आंतरजिल्हा बदलीने अहिल्यानगर जिल्हा परिषदे मध्ये वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट क या पदावर नेमणुक करण्यात येत आहे.

२) त्यांना इकडील जिल्हा परिषदेमध्ये वरिष्ठ सहाय्यक (लिपीक)गट क या पदासाठी रुजु झालेनंतर त्या पदावरील त्यांची या जिल्हा परिषदेमध्ये सेवाजेष्ठता या जिल्हा परिषदेत ज्या दिनांकास कामावर रुजू होतील त्या दिनांकापासुन ग्राहय धरण्यात येईल.

३) सध्या कार्यरत असलेल्या जिल्हा परिषदेकडुन त्यांचेकडेस कोणत्याही प्रकारची थकबाकी वसुलीस अहिल्यानगर जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही.

..२

४) आदेशातील नमुद कर्मचारी यांना सध्याच्या कार्यरत जिल्हा परिषदेकडुन कार्यमुक्त झाल्यानंतर अहिल्यानगर जिल्हा परिषदेमध्ये रुजु होण्याकरिता नियमाप्रमाणे बदली विनंतीनुसार असल्याने वाटचाल कालावधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

५) अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या आंतरजिल्हा बदलीबाबतच्या अटी व शर्ती असतील त्या त्यांना बंधनकारक राहतील.

६) अहिल्यानगर जिल्ह्यात कोठेही बदलीस पात्र राहतील.

७) आंतर जिल्हा बदलीने हजर झालेनंतर संबंधित कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी/डीसीपीएस खाते व खात्यावरील रक्कम ६ महिन्याच्या आत जिल्हा परिषद अहिल्यानगर कडे वर्ग करणेची जबाबदारी संबंधित कर्मचारी व कार्यमुक्त करणाऱ्या जिल्हा परिषदेची राहिल. सदर बाबत काही तक्रारी प्राप्त झाल्यास त्यास जिल्हा परिषद अहिल्यानगर जबाबदार राहणार नाही.

८) आंतर जिल्हा बदलीने अहिल्यानगर जिल्हा परिषदेकडे सामावुन घेणे कामी संमतीपत्र तसेच पदस्थापना आदेशाच्या दिनांकापासुन संबंधित कर्मचारी यांना पदस्थापनेच्या ठिकाणी १ महिन्याच्या आत हजर होणे बंधनकारक राहिल. त्यानंतर सदरचा आदेश आपोआप रद्द समजणेत येईल याची नोंद घ्यावी.

९) जिल्हा परिषदेची नोकरी सोडण्याची झाल्यास एक महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल अथवा एक महिन्याचे वेतन जमा करावे लागेल.

१०) नेमणुकीबाबत व सेवाशर्तीबाबत शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश त्यांना बंधनकारक राहतील.

उपरोक्त १ ते १० अटी व शर्तींनुसार श्रीम स्वाती प्रविण बोराडे, वरिष्ठ सहाय्यक (लि), यांना अहिल्यानगर जिल्हा परिषदेमध्ये त्यांच्या नावासमोर रकाना क्रं ६ मध्ये दर्शविल्या ठिकाणी वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) गट-क या पदावर आंतरजिल्हा बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202607230401 34...... असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 23-07-2026 22:25:02
(आनंद भंडारी)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

**प्रति:- श्रीम स्वाती प्रविण बोराडे, वरिष्ठ सहाय्यक (लि), पंचायत समिती चाळीसगाव, जि.प.जळगाव**

**प्रतिलिपी - योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी व माहीतीसाठी.**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद जळगाव / अहिल्यानगर
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव / अहिल्यानगर
४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती चाळीसगाव, जिल्हा परिषद जळगाव
५. गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर

स्वाक्षरीत/--
(आनंद भंडारी)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर